# बहि:शाल शिक्षण मंडळ

## अहवाल : २०१७-१८

**"डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला अहवाल "**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळांतर्गत डा ॅ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला यशस्वीपणे राबविण्यात आली. दि. १४/१२/२०१७ ते दि.१६/१२/२०१७ या कालावधीत सदर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. दि. १४/१२/२०१७ रोजी डॉ. प्रसाद जोशी यांनी "जग जिंकूया संवादाने" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आज माणसा-माणसांमधला संवाद हरवत चालल्याने माणसं एकलकोंडी व अधिकाधिक आत्मकेंद्री होत आहेत. परिणामी ते नैराश्याने ग्रासले जातात. यातुन बाहेर पडायचे असेल तर आपल्यातील संवाद वाढायला हवा. संवादामध्ये जग जिंकण्याची ताकद असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

दि. १५/१२/२०१७ रोजी डॉ. गिरीश पाटील यांनी "पत्रकारितेतील संधी : वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण" या विषयावर व्याख्यान दिले. आज एकीकडे संगणकाचे युग असताना पत्रकारितेतील संधीही दिवसेंदिवस वाढत आहे. पत्रकारितेतून वैज्ञानिक संशोधन व दृष्टिकोन हे खुपच कमी प्रमाणात बघावयास मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

दि.१६/१२/२०१७ रोजी प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांनी "जावे कवितेच्या गावा" हा अनोखा प्रयोग सादर केला. या प्रयोगात त्यांनी कवितेच्या जन्मापासून ते आजतागायत तिचा प्रवास कसा होत गेला हे अनेक कवितांच्या सादरीकरणाने सांगितले. या प्रवासात ओवी,अभंग, चारोळ्या, हायकू पासून ते आजच्या आधुनिक कवितेपर्यंतचा इतिहास डॉ. गमे यांनी सांगितला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डा ॅ. बापूसाहेब जगदाळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी एकापेक्षा जास्त भाषांचे ज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्रत्येक भाषेतील साहित्य हे त्या त्या समाजाचा, राष्ट्राचा , संस्कृतीचा असल्याचेही ते पुढे म्हणाले.

**" संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमाला अहवाल "**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक या बहिःशाल शिक्षण केंद्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळांतर्गत "संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमाला यशस्वीपणे आयोजित करण्यात आली.

दि. १८/१२/२०१७ रोजी जेष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. जी. बी. शहा यांनी "इतिहासाचे जतन व संवर्धन" या विषयावर मार्गदर्शन केले. इतिहास घडवायला अनेक शतकांचा कालखंड लागतो. त्यामुळे त्याचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी व कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. दि.१९/१२/२०१७ रोजी के. मा. मोरे

यांनी "सकारात्मक जीवनशैली" या विषयावर मार्गदर्शन केले. आज बहुतेक समाज चुकीच्या पद्धतीची जीवनशैली जगत असल्याने त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. तसेच मनोवस्था देखील निराशमय झालेली आहे. त्यामुळे सकारात्मक जीवनशैलीचे फायदे त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले.

दि.२०/१२/२०१७ रोजी नथुजी देवरे यांनी "आनंदी जीवन" या विषयावर व्याख्यान दिले. आहार , व्यायाम आणि मनःस्वास्थ्य ही आनंदी जीवनाची त्रिसूत्री त्यांनी सांगितली.

**"यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला अहवाल "**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक या बहिःशाल शिक्षण केंद्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळांतर्गत "यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला" यशस्वीपणे राबविण्यात आली. दि. ११/१२/२०१७ ते दि. १३/१२/२०१७ या कालावधीत सदर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

दि. ११/१२/२०१७ रोजी डॉ. राजेंद्र भामरे यांनी "प्रबोधन ते ज्ञानोदय" या विषयावर व्याख्यान दिले. स्वातंत्र्यानंतर देशाला प्रबोधनाची आवश्यकता होती, त्यानुसार तत्कालीन समाजधुरीनांनी जनतेच्या प्रबोधनाला महत्त्व दिले होते. परंतु आजच्या आधुनिक जगात प्रबोधनाची जागा ज्ञानाने घेतली आहे. प्रबोधन ते ज्ञानोदय हा प्रवास डॉ. राजेंद्र भामरे यांनी आपल्या व्याख्यानातून व्यक्त केला.

दि. १२/१२/२०१७ रोजी डॉ. राहूल पाटील यांनी "इंडिया २०२०" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भारत २०२० मध्ये प्रवेश करीत असताना देशासमोर अनेक प्रश्न आहेत, समस्या आहेत. परंतु जेथे संकट आहे तेथे तेथे नक्कीच संधी असते. या संधीचे सोने करून देशाच्या विकासासाठी प्रत्येकजण हातभार लावू शकत असल्याचे प्रतिपादन डाॅ. राहूल पाटील यांनी केले.

दि.१३/१२/२०१७ रोजी डॉ. सुदेश घोडेराव यांनी "अंधश्रद्धा निर्मूलन" या विषयावर सप्रयोग व्याख्यान दिले. आजही ग्रामीण भागात बुवाबाजी करणारे लबाड लोक वैज्ञानिक ज्ञानाचा दुरूपयोग करून गोरगरीबांच्या लुबाडणूक करीत असतात, त्यांच्या भावनांशी खेळत असतात. अशा लोकांची लबाडी उघड करण्यासाठीचे अनेक उपाय त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी भोंदूगिरी करणाऱ्यांवर विश्वास न ठेवता विज्ञानाची कास धरून प्रगती करायला हवी. तसेच सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून अडाणी व गोरगरीब समाजाला बुवाबाजी च्या जोखडातून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

**डॉ. किरण पिंगळे**